गुरूवार, दिनांक ३० जुलै, २०२०

अधिसूचना

क्रमांक : ५१/२०२० **दिनांक : ३०.०७.२०२०**

विषय : ऑनलाईन परीक्षांच्या कामासंबंधी महाविद्यालयांना कराव्या लागणाऱ्या खर्चाचे परिमाण ठरविण्याबाबत.

सर्वसंबंधितांचे माहितीकरीता याद्वारे अधिसूचित करण्यात येते की, विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयांना व परीक्षा केंद्रांना ऑनलाईन परीक्षांसंदर्भात लेखी परीक्षा, प्रात्यक्षिक परीक्षांचे संचालन करण्याकरीता प्रवेशपत्रे, उपस्थिती पत्रके, कंट्रोलशिट्स या दस्तऐवजांचे प्रिन्ट काढण्याकरीता माहाविद्यालयांना/ परीक्षा केंद्रांना प्रदान करावयाच्या रकमेचे परिमाण ठरविण्याची बाब विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेनी दि.३०.६.२०२० च्या सभेत मुद्दा क्र.५६ अन्वये विचारात घेवून खालीलप्रमाणे प्रतिविद्यार्थी दरास मान्यता प्रदान केलेली आहे.

अ.क्र.	कार्याचे विवरण	महाविद्यालयांना / परीक्षा केंद्रांना द्यावयाची रक्कम
१	नियमित व माजी विद्यार्थ्यांची परीक्षा प्रवेश पत्राची प्रिन्ट काढण्याकरीता महाविद्यालयांना प्रदान करावयाची रक्कम	प्रति विद्यार्थी रुपये १.५०/-
२	उपस्थिती पत्रकांबाबतची प्रिन्ट काढण्याकरीता परीक्षा केंद्रांना प्रदान करावयाची रक्कम	प्रति विद्यार्थी रुपये १.५०/-
३	कंट्रोलशिट्स (Seating Arrangement) याबाबतचे दस्ताऐवजांचे प्रिन्ट काढण्याकरीता परीक्षा केंद्रांना प्रदान करावयाची रक्कम	प्रति विद्यार्थी रुपये ०३/-

स्वा/-
कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
अमरावती